# <u>प्रेसनोट</u>

दि. २८/११/२०२२

## शिरूर येथील तत्कालीन तहसीलदार, महसुल सहाय्यक, तलाठी व खाजगी इसमांवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. २९२/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७ अ व १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ४६ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक –<br>१) रंजना उमेश उमरहांडे, पद - तत्कालीन तहसीलदार, शिरूर (वर्ग-१)<br>२) स्वाती सुभाष शिंदे, पद - महसूल सहाय्यक, तहसिलदार कार्यालय शिरूर<br>३) सरफराज तुराब देशमुख, पद- तलाठी मौजे शिरूर<br>खाजगी इसम :- ४) अतुल घाडगे, (५) निंबाळकर. |
| लाच मागणी | ४२,००,०००/- (बेचाळीस लाख रूपये) |

पडताळणी - दिनांक :- २५/०५/२०२२ ते दिनांक १९/११/२०२२ दरम्यान पडताळणी करण्यात आली आहे.
गुन्हा दाखल दिनांक :- २८/११/२०२२.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या ट्रस्टच्या जागेचे जागेचे/प्लॉटचे एन.ए. (अकृषक प्रमाणपत्र) प्रस्ताव मंजूर करण्यासाठी व वरिष्ठ कार्यालयातून मंजूरी आणण्यासाठी लोकसेवक क्र. ३ तलाठी देशमुख यानी त्यांच्यासाठी व त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी ४२ लाखाची लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता तक्रारदार यांच्या ट्रस्टच्या जागेचे जागेचे/प्लॉटचे एन.ए. (अकृषक प्रमाणपत्र) प्रस्ताव मंजूर करण्यासाठी व वरिष्ठ कार्यालयातून मंजूरी आणण्यासाठी लोकसेवक क्र. ३ तलाठी देशमुख यानी ४२ लाखाची मागणी केली. सदर कामामध्ये मदत करण्यासाठी लोकसेवक क्रमांक स्वाती शिंदे यानी १ लाख रूपयांची लाच मागणी केली व सदरच्या जागेचा प्रस्ताव पुढे पाठविण्यासाठी व जिल्हाधिकारी कार्यालयात मदत करण्यासाठी लोकसेवक क्रमाक १ रंजना उमरहांडे, तहसीलदार यानी ५ लाख रूपयांची लाचेची मागणी केली. खाजगी इसम आरोपी क्रमांक ४ व ५ यानी सदरच्या प्रस्तावाची जिल्हाधिकारी कार्यालयातून मंजूरी मिळवून देण्यासाठी व मदत करण्यासाठी २० लाख रूपयांची लाचेची मागणी केली. तसेच यातील सर्व आरोपींनी लाच मागणीस सहाय्य करून प्रोत्साहन दिले. म्हणून वरील लोकसेवक क्रमांक १ ते ३ व खाजगी इसम ४ ते ५ यांचविरूद्ध वरीलप्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील आरोपी लोकसेवक क्रमांक ३ तलाठी देशमुख याना गुन्हयाचे तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक, विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१५.<u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
१६.ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
१७.व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
१८.व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
१९.ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
२०.वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.